# महाराष्ट्र विधानसभा

**पहिले अधिवेशन, २०२६**

**सन २०२६-२७ च्या अर्थसंकल्पीय मागण्या**

**माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी**

**सोमवार, दिनांक १६ मार्च, २०२६**

## आदिवासी विकास विभाग

**कपात सूचनांची एकूण संख्या – १०**

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **मागणी क्रमांक: टी-२**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२२५, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग व अल्पसंख्याक यांचे कल्याण**<br>**रूपये:- ३,१९,३२,२१,०००/-**<br>**श्री. नानाभाऊ पटोले** |
| (१) | १४८३ | १० | भंडारा जिल्हयात लाखनी व लाखांदूर तालुक्यातील आदिवासी मुला / मुलींचे शासकीय वस्तीगृह नसणे, त्यामुळे शिक्षण घेणाऱ्या आदिवासी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२) | १४८५ | १० | भंडारा व गोंदिया जिल्हयात मागील ३-४ वर्षांपासून आदिवासी कुटुंबांना खावटी योजना लाभ मिळत नसणे, त्यामुळे या कुटुंबांना आर्थिक व अन्नधान्याची मोठी अडचण होत असल्याने, शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (३) | १४८६ | १० | भंडारा व गोंदिया जिल्हयात शिष्यवृत्ती, शैक्षणिक साहित्य व शिष्यवृत्तीच्या रकमेत विलंब होत असणे, तसेच विद्यार्थ्यांना मिळणारे शैक्षणिक साहित्य (पुस्तके, गणवेश, सायकली) वेळेवर न मिळाल्याने शैक्षणिक प्रगतीवर दुष्परिणाम होत असणे व याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (४) | १४८७ | १० | भंडारा व गोंदिया जिल्हयातील आदिवासी भागात आरोग्य केंद्रे, डॉक्टर व औषधाचा तुटवडा असणे त्यामुळे रुग्णांना लाभ मिळत नसल्याने, शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (५) | १४८८ | १० | भंडारा व गोंदिया जिल्हयातील आदिवासी युवकांना कौशल्य प्रशिक्षण व रोजगाराच्या संधी कमी प्रमाणात मिळत असल्याने, शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **मागणी क्रमांक: टी-५**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २०५९, सार्वजनिक बांधकामे**<br>**रूपये:- १६,३७,४१,०००/-**<br>**श्री. संजय मेश्राम** |
| (६) | १५३३ | १० | उमरेड विधानसभा मतदारसंघातील आदिवासी समाजाची संख्या मोठी आहे. कुही तालुका, भिवापूर तालुका आणि उमरेड तालुका मध्ये मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक शाळा, होस्टेल आणि इतर शैक्षणिक सुविधा उभारणे अत्यंत गरजेचे आहे. सदर परिस्थिती लक्षात घेता, शासनाने आदिवासी विभागाच्या २०५९ हेड – बांधकाम अंतर्गत या तालुक्यांमध्ये आदिवासी मुलांच्या शिक्षणासाठी आवश्यक शाळा व होस्टेल बांधकाम करावे आणि समाजाच्या उन्नतीसाठी निधी तातडीने मंजूर करावा, आदिवासी समाजाच्या मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक ती कार्यवाही त्वरित पार पाडली जावी, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **मागणी क्रमांक: टी-५**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ३०५४, मार्ग व पूल**<br>**रूपये:- १,००,००,००,०००/-**<br>**श्री. संजय मेश्राम** |
| (७) | १५२० | १० | उमरेड विधानसभा मतदारसंघातील आदिवासी समाज भरपूर असून, अनेक ग्रामांमध्ये रस्ते, पायवाटी, पूल व डांबरीकरणाची स्थिती अत्यंत बिकट आहे. अनेक गावांमध्ये नागरिक, विद्यार्थी आणि रुग्ण वैद्यकीय सुविधा मिळवण्यासाठी त्रास सहन करतात. सदर परिस्थिती लक्षात घेता, शासनाने आदिवासी विभागातील ३०५४ हेड अंतर्गत निधी तातडीने मंजूर करून आदिवासी गावांमध्ये रस्ते, पायवाटी व पूल बांधकामासाठी कार्यवाही करावी, तसेच प्रलंबित विकासकामे त्वरित पार पाडली जावीत, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. अस्लम शेख** |
| (८) | १४५४ | १० | मौजे बोरगांव ग्रुप ग्रामपंचायत (तालुका-पेण, जिल्हा-रायगड) येथील खवसावाडी, काजुचीवाडी, केळीचीवाडी, तांबडी आणि उंबरमाळवाडी या पाचही आदिवासी वाड्यांच्या मूलभूत सुविधांसाठी या गावातील ग्राम संवर्धन सामाजिक संस्थेने मागील दहा वर्षापासून सातत्याने मा.जिल्हाधिकारी, रायगड यांचेकडे रस्त्यासाठी पाठपुरावा करुनही अद्यापर्यन्त रस्त्याचे काम सुरु केले नसल्याने जवळपास ५ – ६ कि.मी.अंतर पेण-सुधागड तालुक्याच्या ठिकाणी पायवाटेने चालत जावे लागणे, या पाचही आदिवासी वाड्यांच्या रस्त्यासाठी जानेवारी, २०२४ च्या सुमारास मे.सिध्दिविनायक कंन्स्ट्रक्शन ठेकेदाराला ७ कोटी ६० लाख रुपयांचा निधी मंजूर |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | करुनही अद्यापपर्यन्त रस्त्यांच्या कामास सुरुवात झालेली नाही. मागील दोन वर्षात रायगड जिल्हाधिकारी कार्यालयासह संबंधित सर्व विभाग कार्यालयांवर मोर्चे आंदोलने काढून या भागातील आदिवासींच्या वाट्याला आलेला विकास निधी रायगड जिल्हापरिषद, पेण उपविभागाचे अभियंता आणि ठेकेदारांनी गिळंकृत केला असून याबाबत माहितीच्या अधिकारात माहिती मागवली असता तीही उपलब्ध करुन न देणे, जि.प.रत्नागिरी सा.बा.विभागाने मौजे चिंभावे ग्रामपंचायत हद्दीमधील धनगरवाडीत जाण्या येण्यासाठी रस्ता तयार करुन देण्याच्या कामाकडे सातत्याने दुर्लक्ष करीत असल्याने या भागातील नागरीकांमध्ये पसरलेली तिव्र असंतोष व संतापाची लाट, मौजे बोरगांव (तालुका-पेण, जिल्हा-रायगड) ग्रामपंचायत हद्दीमध्ये खवसावाडी, काजुचीवाडी, केळीचीवाडी, तांबडी आणि उंबरमाळवाडी या पांचही आदिवासी पाडयातील अंदाजे ४५० लोकवस्ती असलेल्या आदिवासींच्या पाडयात जाण्या येण्यासाठी ६ कि.मी.चा रस्ता तयार करुन देण्यायाबाबत, शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (९) | १४५५ | १० | मौजे वाकण (खांबेश्वरवाडी-रोहिदासवाडी) (तालुका-पोलादपूर, जिल्हा-रायगड) या ३.५ कि.मी. आदिवासी वाडी जोड रस्त्याचे मजबूतीकरणासह डांबरीकरण करुन संपूर्ण मार्गावर संरक्षण भिंत बांधून देण्यासाठी या भागातील आदिवासींनी जानेवारी, २०२६ अखेर व तत्पूर्वी मा.जिल्हाधिकारी, रायगड यांचेकडे निवेदने देवूनही शासकीय दिरंगाईमुळे वाडीजोड रस्त्याचे काम अपूर्णावस्थेत असणे, सद्य:स्थितीत प्रकरण शासनान कडे प्रलंबित असणे, मौजे वाकण हे गावच्या वाडीवस्त्या उंच डोंगरपायथ्याशी बसलेले असल्याने जोरदार अतिवृष्टीत वादळ वाऱ्याने डोंगरकडा कोसळून गांव जमिनीत गाडले जाण्याची भिती असल्याने गावकरी जीव मूठीत धरुन चिंता विवंचनेत जीवन जगत आहेत, असल्याने आदिवासीमध्ये पसरलेली तीव्र नाराजी, संतापाची भावना, त्यांच्या सहनशिलतेचा उद्रेक होवून वेळप्रसंगी अप्रिय घटना घडण्याची निर्माण झालेली शक्यता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१०) | १४५६ | १० | मौजे चिंभावे (तालुका-म्हाड, जिल्हा-रत्नागिरी) ग्रामपंचायत हद्दीमध्ये आदिवासी व धनगर समाजातील अंदाजे २५० लोकवस्ती असलेल्या वाडीत जाण्या येण्यासाठी देशाला स्वातंत्र्य मिळून ७७ वर्षे झाल्यानंतर आजही रस्ता नसल्याने जवळपास ६ कि.मी अंतर टेकडीवर पायवाटेने चालत जावे लागणे, गावातील दिपेश विठ्ठल माने यांचे १२ ऑगस्ट, २०२४ रोजी ठाणे जिल्ह्यातील मानपाडा येथे अकस्मात निधन झाले. त्यांचा मृतदेह अंत्यसंस्कारसाठी गावी आणण्यात आला. मात्र गावात जायला रस्ताच नसल्याने मृतदेह काठीला चादर बांधून डोली तयार करण्यात आली व त्यातून मृतदेह नेण्यात आला. हीच परिस्थिस्ती गावातील आजारी, गरोदर महिला, अबालवृध्द आजारी पडल्यास त्यांना डोली करुन किंवा झोळीतून औषधोपचारासाठी शहराच्या ठिकाणी नेण्यात येते. जि.प.रत्नागिरी |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | सा.बा.विभागाने मौजे चिंभावे ग्रामपंचायत हद्दीमधील आदिवासी व धनगरवाडीत जाण्या येण्यासाठी रस्ता तयार करुन देण्याच्या कामाकडे सातत्याने दुर्लक्ष करीत असल्याने या भागातील नागरीकांमध्ये पसरलेली तिव्र असंतोष व संतापाची लाट, मौजे चिंभावे (तालुका-म्हाड, जिल्हा.रत्नागिरी) ग्रामपंचायत हद्दीमध्ये आदिवासी व धनगर वाडीत जाण्या येण्यासाठी ६ कि.मी.चा रस्ता तयार करुन देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

**विधान भवन**
**मुंबई,**
**दिनांक : १३ मार्च, २०२६**

**डॉ. विलास आठवले,**
**सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) आदिवासी विकास विभाग
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई